# ओळख संगीतशास्त्राची

डॉ. भाग्यश्री कुलकर्णी



परी प्रकाशन

ओळख संगीतशास्त्राची

◆ ———————

© सुरक्षित
◆ ———————

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ———————

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ———————

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆ ———————

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ———————

**किंमत :**
रुपये १२०/-

## अनुक्रमणिका

१. इतिहास ........ ३
२. संगीतविषयक संज्ञा आणि व्याख्या ........ २१
३. प्रसिद्ध शास्त्रीय गायक ........ ३७
४. विविध गीतप्रकार ........ ५४
५. प्रसिद्ध घराणी ........ ७२
६. कर्नाटकी संगीत ........ ७८
७. रागांवर आधारित गीते ........ ८१
८. प्रसिद्ध गीतकार ........ ११९
९. प्रसिद्ध संगीतकार ........ १३२
१०. प्रसिद्ध गायक ........ १४६



# इतिहास

प्रत्येक माणसाला संगीत आवडते. जात, धर्म, लिंग, वय, भाषा इत्यादींच्या पलीकडे जाऊन संगीत आपला प्रभाव व्यक्तीच्या मनावर टाकित असते. लहान बालकाला संगीताची ओळख त्याच्या आईकडून अंगाई गीताद्वारे होते. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच संगीताची विलक्षण मोहिनी पडते. एखादे गीत किंवा वाद्यधुन ऐकल्यास नकळत ताल धरला जातो, शब्द गुणगुणले जातात. म्हणजेच संगीतापासून अपवाद सोडल्यास कोणीच अलिप्त राहू शकत नाही.

संगीत ही गुरुमुखी विद्या आहे. गुरूनेच संगीताचे धडे द्यावे लागतात. ग्रंथ वाचून, मैफिलींना उपस्थित राहून किंवा ध्वनिमुद्रिका ऐकून संगीत ही कला साध्य होत नाही. संगीत आत्मसात करण्यासाठी परिश्रम, जिद्द, चिकाटी इत्यादी गुणांची आवश्यकता असते. अलीकडे सामान्य म्हणजे ज्या व्यक्तीने शास्त्रोक्त संगीत शिक्षण घेतलेले नाही अशा रसिकांनाही राग, ताल, लय यांची ओळख होऊ लागलेली आहे. मोठ्या संख्येने पालकवर्ग आपल्या पाल्यांना लहान वयातच संगीताचे प्राथमिक धडे देण्याच्या हेतूने प्रेरित झालेले दिसतात.


सुरुवातीला 'संगीत' याविषयी सर्वसाधारण अशी माहिती घेणे योग्य ठरेल. संगीत या एका शब्दातच गीत, वाद्य आणि नृत्य या तिन्ही कलाविशेषांचा समावेश होतो.

गीतम् वाक्षम् नर्तनं च त्रयम संगीतमुच्यते
मार्ग देशी विभागन संगीतम् द्विविधम् मतम् ।।

गीत, वाद्य आणि नृत्य यांच्या सुयोग्य एकत्रीकरणाला 'संगीत' असे म्हणतात. गायनामध्ये वादन व नर्तन; वादनामध्ये गीत व नर्तन आणि नर्तनामध्ये गायन व वादन या क्रियांचा समावेश असतो. संगीत या शब्दातील 'सं' म्हणजे उत्तम, 'गीत' म्हणजे शब्द किंवा काव्य – उत्तम पद्धतीने

उत्कृष्ट गीत गाणे अथवा वाजविणे म्हणजे संगीत होय. याचप्रमाणे दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास 'सं' म्हणजे स्वर; 'गी' म्हणजे गीत आणि 'त' म्हणजे ताल होय. स्वरतालबद्ध गीत म्हणणे किंवा वाजविणे किंवा अभिनय आविष्कृत (सादर) करणे यालाच संगीत असे म्हणतात. प्रत्येक व्यक्तीस कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या संगीताची आवड स्वाभाविकरित्या असतेच असते.

आपल्या संगीत पद्धतीमध्ये जी गीते गायिली जातात किंवा वाजविली जातात ती स्वरांच्या नियमांनी बांधलेली असतात. हे नियम म्हणजेच 'राग' होय. रागातील स्वर म्हणजे कायम उंचीचा अखंड आणि मधुर असा स्थिर नाद होय. संगीतामध्ये सात स्वर असतात. दिवसाच्या प्रत्येक प्रहरासाठी वेगवेगळे राग गायचे किंवा वाजवायचे हे आपल्या संगीताचे वैशिष्ट्य आहे. रागाचे गायन किंवा वादन कोणत्या वेळी करायचे यासंबंधी पूर्वीपासून रागसमयाची काही बंधने मानली गेली आहेत. कोणता राग कोणत्या वेळेला गायला किंवा वाजवला तर त्याचा परिणाम अधिक होऊ शकेल याचा विचार करून रागसमय निश्चित केलेला आहे. रागातील स्वराच्या संख्येवरून रागाच्या जाती मानल्या गेलेल्या आहेत.



भारतामध्ये अतिप्राचीन काळापासून संगीताची आराधना केली जाते. या संदर्भातील उल्लेख पुराणे, रामायण, महाभारत, दंतकथा यांमधून मिळतात. भारतीय संगीताची निर्मिती देवांनी केली असे मानण्यात येते. याबाबतीत अनेक मत–मतांतरे आहेत. काहीजण ब्रह्माने सामवेदातून संगीताची निर्मिती केली, कोणी वीणाधारिणी सरस्वती ही संगीताची जननी आहे, तर काहीजण शिवशंकर यांनी वृत्रासुराला ठार केल्यावर तांडव नृत्य केलं, या नृत्याला गणेशाने ताल धरला होता; त्यामुळे शिवशंकर यांनी संगीत निर्माण केले असे मानतात. इंद्राच्या दरबारात गंधर्व गायन करीत असत, अप्सरा नृत्य करीत असत आणि तुंबरू वाद्याचे वादन करीत असत. म्हणजे इंद्रलोकात 'संगीत' प्रिय होते. पृथ्वीतलावर स्वर्गीय संगीत आणण्याचा मान नारदमुनींच्याकडे जातो. थोडक्यात, भारतीय संगीत हे प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याचे या सर्वांमधून निष्पन्न होते.

संगीत कलेच्या विकासाचे चार टप्पे मानले गेले आहेत. हिंदुस्थानी संगीत इतिहासाचे चार टप्पे पुढीलप्रमाणे सांगता येतील – १) वैदिक कालखंड २) पौराणिक कालखंड ३) सुवर्णयुग किंवा मध्यकाल ४) ब्रिटिशकाल.

## १) वैदिक कालखंड :

संपूर्ण विश्वातील संगीताचा मूळ आधार वेदगायनास मानले जाते. चारही वेदांत सामवेदाला संगीताच्या दृष्टीने महत्त्व होते. याचे कारण म्हणजे सामवेद हा संगीतासाठी वाहिलेला वेद आहे. सामवेद हा गेय वेद असून त्यातून संगीत निर्माण झाले. ऋग्वेदातील छंदमय मंत्राचे पठण साम गायनाच्या आश्रयाने केले जात असे. स्वर हे सामाचे प्रमुख अंग आहे आणि स्वरलहरीने सामाची गती दाखविली जाते. सुकर्मा याच्याकडे सामवेदाचा प्रसार भारतभर करण्याचे श्रेय दिले जाते. सामाचा आरंभ ॐ या स्वराने होतो.

ऋग्वेदामध्ये दुंदुभी, वेळू, करकरी या वाद्यांचा उल्लेख आढळतो. ऋग्वेदातील ऋचांचे, स्तोत्रांचे किंवा गाथांचे गायन होत असे.

यजुर्वेदामधील संगीत प्रगत झालेले होते. कारण यजुर्वेदामध्ये महिलांच्या गायनाचा आणि वादनाचा उल्लेख आढळतो. गायनाबरोबर वाद्यांची साथसंगतही महिला करीत असत. पुरुषांबरोबर स्त्रियांनाही संगीत शिकता येत असे. या काळात संगीताला मोठी प्रतिष्ठा होती.

अथर्ववेदातील संगीतामध्ये गंधर्व, अप्सरा यांचा उल्लेख आढळतो म्हणजेच गायन, वादन आणि नृत्य या काळात प्रिय होते.

वेदकाळात संगीत निर्मितीबरोबरच संगीताची माहिती देणाऱ्या ग्रंथांची निर्मिती झाली. नारदीय शिक्षा, मांडुकी शिक्षा, संगीत मकरंद इत्यादी ग्रंथांमधून संगीतशास्त्राविषयी शास्त्रीय माहिती दिलेली आहे. या ग्रंथांवरून संगीताच्या तत्कालीन विकासाची कल्पना येते.

भारतीय संगीताचा अभ्यास जरी वेदकाळापासून होत असला तरी त्यापूर्वी सिंधू संस्कृतीच्या उत्खननात मिळालेल्या मूर्तीवरून त्या काळी संगीत होते हे सिद्ध होते मात्र अभ्यास करण्याइतके पुरावे त्या कालखंडात मिळत नाहीत म्हणून भारतीय संगीताचा इतिहास वेद काळापासून सुरू होतो.

## २) पौराणिक कालखंड :

पौराणिक कालखंडामध्ये वाल्मिकींनी रामायणाची आणि व्यासांनी महाभारताची रचना केली. रामायण आणि महाभारत या दोन ग्रंथांतील संगीतातील उल्लेख तत्कालीन संगीताचा परिचय करून देतात. रामायण-महाभारत या काळात शंख, भेरी, पणव, आनक इत्यादी वाद्यांचा वापर होत होता असे दिसते. रामायणामध्ये अनेक ठिकाणी संगीताचा उल्लेख आढळतो. 'गांधारग्राम' या शब्दाचा संदर्भ दिलेला आहे. राम-लक्ष्मण यांना संगीत समजत होते. लव-कुश यांनी रामासमोर रामायणाचे गायन केले. ते कदाचित वाल्मिकी ऋषींच्याकडून संगीत शिकले असावेत कारण वाल्मिकी हे लौकिक संगीताचे पंडित होते.

महाभारतामध्ये कृष्णाच्या मुरलीवादनाने प्राणी-पक्षी-मानव हे सारेच मंत्रमुग्ध होत असत. गायन-वादनाबरोबरच या काळात नृत्याविष्कारही होत होता. अप्सरांचे नर्तन, अज्ञातवासात असलेल्या अर्जुनाने 'बृहन्नडा' स्वरूप घेऊन विराटकन्या उत्तरा हिला दिलेले नृत्यशिक्षण यावरून त्या काळातील संगीतकलांचे स्थान समजून येते. यानंतरच्या काळात गायन, वादन, नर्तन इत्यादींचा व्यावसायिक लोकांचा वर्ग निर्माण झाला. याच काळात तक्षशिला, नालंदा, काशी इत्यादी ठिकाणी कलाशिक्षण देणारी विद्यापीठे निर्माण झाली. या विद्यापीठांमध्ये केवळ भारतीयच विद्यार्थी नव्हे तर परदेशातील विद्यार्थीही शिक्षण घेत असत. याच विद्यापीठांमधून हिंदी संस्कृती आणि संगीत परदेशी विद्यार्थ्यांनी आत्मसात करून आपल्या देशात नेले.

याच काळात साहित्य, संगीत आदी गोष्टींना खूप प्रोत्साहन मिळाले. प्रत्येक सुसंस्कृत व्यक्तीला साहित्य, संगीत इत्यादी कलांचे ज्ञान होते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील ती (कला) एक अविभाज्य घटक होती. या कलेशिवाय माणूस माणूस नाहीच असेच होते. कालिदासाने म्हटले त्याप्रमाणे

साहित्य संगीत कलाविहीन :<br>
साक्षात पशु: पुच्छविषाणहीन :

अशीच माणसांची ओळख सांगता येईल.

पाचव्या शतकात लिहिल्या गेलेल्या 'पंचतंत्र' या नीतिशास्त्र ग्रंथामध्ये संगीताविषयी मोठ्या प्रमाणात उल्लेख आढळतात. यावरून त्या काळात संगीत हे सर्वसाधारण माणसांच्या नेहमीच्या परिचयाचे होते हे दिसून येते. भरताचा 'नाट्यशास्त्र' हा पाचवा वेद मानला जातो. कालिदास याचे मेघदूत, शाकुंतल, रघुवंश, मृच्छकटिक इत्यादी ग्रंथ त्याच्या उच्च कोटीच्या कवित्वाची साक्ष देतात.

पौराणिक काळामध्ये यज्ञ-यागाच्या वेळी जे गायन होई किंवा संगीतनिर्मिती केली जात असे तिचे क्षेत्र मर्यादित होते. ठराविक लोकांपुरतेच मर्यादित होते. म्हणूनच याला 'मार्गी संगीत' असे म्हणत असत. मार्गी संगीताच्या आधारे देशी संगीतही सुरू झाले. यालाच 'लोकसंगीत' असे म्हणतात. हे लोकांच्या मनाचे रंजन तर करतेच पण लोकसंगीतामध्ये मोजके स्वर वापरले जातात आणि त्याची एकच लय असते. हे लोकसंगीताचे वैशिष्ट्य आहे. देवाच्या आरत्या, भोंडला इत्यादी गीते या प्रकारात अंतर्भूत होतात.

## ३) सुवर्णयुग : मध्यकाल :

मध्यकाळामध्ये संगीत कलेची म्हणावी तशी फारशी प्रगती झाली नाही परंतु संगीतप्रेमी राजांनी, संगीत जाणणाऱ्या सम्राटांनी संगीत कलेला सातत्याने प्रोत्साहन या काळात दिले.

विजयनगरचे राज्य (१३१६ ते १६६६) अत्यंत प्रगत असे राज्य होते. देवगिरीचे यादव राजे यांनी संगीताला प्रोत्साहन आणि उत्तेजन दिले. यादवांच्या राज्यात संगीत कलेचा विकास झालेला दिसून येतो. शारंगदेव याने संगीताने आजवर केलेली प्रगती म्हणजेच संगीत कलेचे शास्त्र 'संगीत रत्नाकरा'मध्ये लिहून ठेवले. रामदेवराय यादव राजापर्यंत संगीत कलेला उत्तेजन मिळाले. त्यांच्या दरबारातील 'गोपाल नायक' हे एक संगीतरत्न होते.

रामदेवाचा पराभव अल्लाउद्दीन खिलजीने केला. या अल्लाउद्दीन खिलजीकडे 'अमीर खुश्रू' नावाचा पर्शियन कवी आणि संगीततज्ज्ञ सरदार होता. रामदेवरायाचा पराभव केल्यानंतर अमीर खुश्रू याने गोपाळ नायकाला आपल्याबरोबर दिल्लीला आणले आणि त्याच्याकडून नवीन संगीत आत्मसात केले. प्रभुत्व मिळाल्यावर अमीर खुश्रूने पर्शियन संगीताचा आणि हिंदुस्थानी संगीताचा सुरेख संगम केला आणि एक अनोखी, नवीन शैली निर्माण केली, नवीन राग तयार केले. सतार, तबला इत्यादी वाद्ये; यमन, सांजगिरी, सरफरदा इत्यादी राग; सुमरा हा ताल; ख्याल, तराना, कव्वाली इत्यादी गीतप्रकार... हे सारं अमीर खुश्रूमुळेच संगीत क्षेत्रास मिळालेले आहे.

यानंतरच्या काळात म्हणजे बाराव्या शतकात जयदेव कवी याचा 'गीतगोविंद' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. जयदेवाने रचलेल्या 'अष्टपदी' वर मालवी, वसंत, विभास इ. रागांची नावे लिहिलेली आहेत. संगीताचे नवीन स्वरूप सांगणारा 'रागतरंगिणी' हा ग्रंथ लोचन कवी याने लिहिला. कबीर, नानक, चैतन्य महाप्रभू, वल्लभाचार्य इत्यादी संतश्रेष्ठींनी भक्तिमार्गाचा आविष्कार करणारी काव्यरचना केली.



मोगल काळातील कलाप्रेमी अकबर याने संगीत कलेस प्रोत्साहन आणि उत्तेजन दिले. त्यामुळे अनेक संगीततज्ज्ञांनी संगीतामध्ये नवनवे प्रयोग केले आणि संगीत कलाक्षेत्रात मोलाची भर टाकली. अकबर गादीवर येण्यापूर्वी ग्वाल्हेर येथील मानसिंहाने (तोमर) ध्रुपद शैलीचा शोध लावला. अकबर हा कलाप्रेमी असल्यामुळे त्याने अनेक गायक, वादक यांना राजाश्रय दिलेला होता. अकबराच्या काळात हरिदासस्वामी आणि त्यांचे शिष्य तानसेन, बैजू, गोपाळ... इत्यादी महान गायक होऊन गेले. तानसेनने मियाँ मल्हार, दरबारी कानडा यासारखे राग आणि 'रवाब' हे वाद्य शोधून काढले. 'तराना' हा प्रकार तानसेनने लोकप्रिय केला. हुसेन शर्की याने 'ख्याल' गायकी प्रचारात आणली. हरिदास स्वामी यांनी अनेक धृपदांची निर्मिती केली.

गुजरातमधील नरसिंह मेहता, राजस्थानामधील मीराबाई यांनी कृष्णभक्तीतून तर तुलसीदास, सूरदास यांनी रामभक्तीतून अनेक काव्यरचना रचल्या.

पुंडलिक विठ्ठल याने 'सद्राग-चंद्रोदय', 'रागमाला', 'नृत्यनिर्णय' इत्यादी ग्रंथांतून संगीतातील कलात्मक प्रयत्नांचे शास्त्र मांडले.

या काळामध्ये कला, कलाकार आणि शास्त्र इत्यादी क्षेत्रांमध्ये संगीताची भरभराट झाल्याने या काळास 'संगीताचे सुवर्णयुग' म्हणतात.


जहांगीर आणि शहाजहान हे सुद्धा अकबराप्रमाणेच संगीतप्रेमी होते. या काळात अनेक कलाकार उदयास आले. तसेच अनेक शास्त्रग्रंथही निर्माण झाले. उदा. सोमनाथचा 'राग विबोध', दामोदरचा 'संगीत दर्पण', अहोबलचा 'संगीत पारिजात'... इत्यादी. दक्षिणेकडील पंडित व्यंकटमखी याने 'चतुर्दंडी प्रकाशिका' या ग्रंथाचे लेखन करून बाहत्तर मेलांची नवीन पद्धती मांडली.

शहाजहाननंतर औरंगजेबच्या कारकीर्दीत संगीताचा राजाश्रय सुटला. संगीत कला ही चैनीची बाब आहे असे ठरवून औरंगजेबाने संगीत समूळ नष्ट करायचे ठरविले. त्यामुळे कलाकारांचा राजाश्रय संपला. अनेक कलाकारांना परागंदा व्हावे लागले. औरंगजेबच्या काळात संगीताची इतकी पिछेहाट झाली की, या काळाला 'कृष्णयुग' म्हणतात.

औरंगजेबच्या कारकीर्दीच्या पूर्वीच्या कालखंडात संगीताची भरभराट झाली. अनेक कलाकार, संगीततज्ज्ञ यांनी संगीताला मानाचे स्थान मिळवून दिले. औरंगजेबनंतरचे सर्वच राजे दुर्बल निघाले त्यामुळे संगीत क्षेत्रामध्ये काहीच घडले नाही. मात्र शेवटच्या महंमदशाहच्या कारकीर्दीमध्ये पुन्हा एकदा संगीत कलेला बहर आला. सदारंग-अदारंग यांनी ख्याल गायकी लोकप्रिय केली तर शौरीमियाने टप्पा गायकी निर्माण केली. याचबरोबर ठुमरी, तराना, दादरा... इत्यादी सर्व प्रकारांना उत्तेजन मिळत गेल्यामुळे संगीत क्षेत्रात मोलाची भर पडली.

## ४) ब्रिटिश काल :

ब्रिटिश लोकांना भारतामध्ये स्वत:चे साम्राज्य स्थापणे आणि व्यापार करणे या गोष्टीमध्ये रस असल्याने त्यांनी संगीत क्षेत्राकडे दुर्लक्ष केलं. मोगलांप्रमाणे संगीताबद्दल ब्रिटिशांना प्रेम नसल्याने संगीत कलेचा राजाश्रय सुटला आणि संगीत व कलाकारांची प्रतिष्ठा घसरली. संगीत कलेला फक्त देशी संस्थानांनी आश्रय दिला त्यामुळे संगीत कला जिवंत तरी राहिली. ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा, मिरज, इचलकरंजी, कोल्हापूर इत्यादी ठिकाणच्या संस्थानिकांनी संगीत कला नाहीशी न होता तिचे पुनरुज्जीवन व्हावे यासाठी खूप प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नामुळे प्रत्येक संस्थानामध्ये अनेक प्रथम श्रेणीचे कलाकार होऊन गेले.


रवींद्रनाथ टागोर

यानंतरच्या काळामध्ये संगीतातील घराणी निर्माण झाली. अनेक संगीतप्रेमी लोकांनी प्रचंड परिश्रम घेऊन कलासाधनेत यश मिळवलं. त्यामुळे संगीतकलेचा स्तर उंचावला मात्र कलेचा आस्वाद घेणारे रसिक संख्येने कमी असल्यामुळे संगीतकला आणि  त्यातील विविध प्रकार ठराविक लोकांपुरतेच मर्यादित राहिले. नवीन शास्त्रग्रंथांची निर्मिती तर झाली नाहीच परंतु जुने शास्त्रग्रंथ लुप्त होत चालले.

हळूहळू संगीतासंबंधीचे ग्रंथ पुन्हा एकदा लिहिले जाऊ लागले. रवींद्रनाथ टागोरांनी 'रवींद्र संगीत' प्रचारात आणले. सर्वसामान्य लोकांच्यापर्यंत संगीत कला पोहोचविण्याचे प्रयत्न सुरू असले तरीसुद्धा ती पोहचत नव्हती. ते काम विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी केले. पलुस्कर यांनी शाळा, महाविद्यालयाप्रमाणे संगीत शिक्षण देणारे गांधर्व महाविद्यालय सुरू केले. संगीत अभ्यासक्रमात सुलभता आणून विद्यार्थ्यांचे लक्ष संगीत शिक्षण घेण्याकडे वळविले. आधुनिक काळात संगीताला खरी प्रतिष्ठा मिळवून दिली ती पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांनीच.

जुने शास्त्र आणि कला यामध्ये काळानुसार बदल झाला आहे का ? याकडे पं. विष्णू नारायण भातखंडे यांचे लक्ष गेले. त्यांनी प्रथम संगीत शिकून, ग्रंथाभ्यास करून, चर्चा करून, भारतभ्रमण करून 'हिंदुस्थानी संगीत पद्धती' या नावाने चार ग्रंथांमध्ये संगीत शास्त्र मांडले. त्यांनी मिळविलेल्या हजारो चिजा रसिकासाठी, शिष्यासाठी त्यांनी प्रसिद्ध केल्या. त्यांच्या या मोलाच्या योगदानामुळे संगीत  कलेवर आणि संगीत शास्त्रावर अनंत उपकार झालेले आहेत. याशिवाय 'मॉरिस कॉलेज ऑफ म्युझिक' ही संस्था त्यांनी स्थापन करून संगीत कला शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे संगीत कला अधिकच बहरू लागली. ग्रामोफोन कंपनींनी प्रसारित केलेल्या ध्वनिमुद्रिकांमुळे अनेक गायिका–गायकांचे गायन किंवा वादन घरात बसून ऐकता येऊ लागले. आकाशवाणीचे पदार्पण झाल्यावर संगीत रसिकांना पर्वणीच मिळाली. समाजातील सर्व स्तरांकडे संगीत वाटचाल करू लागले आणि चित्रपटामध्ये संगीत हा प्राण होऊन बसला. पुढे निर्भेळ असे संगीत क्षेत्र न राहता व्यावसायिक–धंदेवाईक कलाकार निर्माण होऊ लागले.

## ५) स्वातंत्र्यानंतर :

देश स्वतंत्र झाल्यावर संस्थानांचे अस्तित्व संपुष्टात आले. त्यामुळे संस्थानांनी संगीत कलेला दिलेला आश्रय संपला. लोकशाही सरकारने कलांचे जतन, पोषण करण्यासाठी, संगीताचा सर्वांगीण विकास करण्यासाठी 'संगीत नाटक अकादमी' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेद्वारे देशभर संगीत नृत्य, नाटक इत्यादी कलांची प्रगती करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. आकाशवाणी आणि प्रांतिक सरकार यांच्यामार्फत संगीत समारोह होत आहेत. चित्रपटांमुळे पार्श्वगायन, वाद्यवृंद इत्यादींना नव्या चालना मिळत आहेत. संगीतावर अनेक बाजूंनी प्रकाश टाकून विविध प्रकारचे संशोधन केले जात आहे.

शाळा आणि महाविद्यालये, विश्वविद्यालये यांमध्ये संगीत विषयाचा समावेश केला गेला आहे. पदविका, पदवी, पदव्युत्तर असे संगीतामध्ये शिक्षण दिले जात आहे. संगीत विषयावर 'विद्यावाचस्पती' सारखी सर्वात श्रेष्ठ पदवी मिळवता येऊ लागली आहे. शालेय स्तरावर किंवा महाविद्यालयीन स्तरावर संगीत हा विषय अंतर्भूत केला जातो पण नंतरच्या काळात केवळ संगीत शिक्षण देणारी विद्यापीठे स्थापन केली गेली आहेत. संगीत कलेला वाहिलेली मासिके, संगीतावरची समीक्षणे प्रसिद्ध होत आहेत. चित्रपटात तर संगीत असायलाच लागते. तिथेही संगीतावर नवनवीन प्रयोग केले जातात.

पाश्चिमात्त्य लोक भारतीय संगीत शिकण्यासाठी मोठ्या संख्येने भारतात येत असतात. रविशंकर यांनी अमेरिकेमध्ये संगीत शिक्षण देणारी संस्था स्थापन केलेली आहे.

लोप पावत चालत असलेल्या गुरुकुल पद्धतीचे पुनरुज्जीवन करून घराणी टिकवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

✦

## उगम :

अशा प्रकारे संगीत नाटके, चित्रपट, आकाशवाणी, दूरदर्शन, मैफिली या साऱ्यांमुळे संगीत क्षेत्रामध्ये विलक्षण क्रांती होऊन, संगीताचे विविध प्रयोग घरोघरी सहजपणे पोहोचले. लहानांपासून वयोवृद्धांपर्यंत आज संगीत गेले आहे. अशा या सर्वांवर मोहिनी टाकणाऱ्या संगीताचा उगम कसा झाला असेल ? असा प्रश्न सहज मनात येतो. संगीताच्या उगमाचा शोध घ्यायचा झाल्यास आपल्या संस्कृतीच्या उगमाचा शोध घेणे आवश्यक ठरते.

आदिमानव आपल्या उपजीविकेसाठी जंगलात हिंडत असे. त्यावेळी त्याला अनेक पशू-पक्ष्यांचे काही कर्कश्श तर काही मधुर स्वर ऐकायला येत असत. काही वेळा हा आदिमानव पशू-पक्ष्यांचे स्वर स्वत: काढून शिकार मिळवित असे. कालांतराने स्वत:च्या आनंदाच्या, रागाच्या